

Kisan Shikshan Prasarak Mandal,
Borgoan (Kale) Tq. & Dist. Latur's

NAAC Accredited 'B' Grade

# Vasantrao Kale Mahavidyalaya,

## Dhoki. Tq & Dist - Osmanabad.

&

## Akhil Maharashtra Itihas Parishad, Pune

Jointly Organize

One Day International Conference on

# "The History of Pandemic like Covid-19 & Its Impat on Socio-Economic & Political Sectors in the World"

Tuesday, 20th October 2020

ISSN No. : 2278-9308
Impact Factor : 7.675

Editor
Dr. N. P. Manale
(Convenor)

Chief Editor
Dr. Satish Kadam
(President, AMIP)

Executive Editor
Dr. Haridas Fere
(Principal)

Organized by

Department of History
Kisan Shikshan Prasarak Mandal, Borgoan (Kale) Tq. & Dist. Latur's

VASANTRAO KALE MAHAVIDYALAYA, DHOKI
Tq & Dist.- Osmanabad - 413508

Scanned with CamScanner

## INDEX

Marathi /Hindhi


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | वैश्विक महामारी :कोरोना व्हायरस ( कोविड १९ ) | प्रा.डॉ.सी.जी कडेकर | 1 |
| 2 | साथीच्या रोगांचा इतिहास आणि कोविड १९ | कविता रामहरी फुगे | 5 |
| 3 | कोविड १९ महामारीचा जगातील शिक्षण, रोजगार, संस्कृती आणि मानवी आरोग्यावर पडलेला प्रभाव | सन्मित बाबासाहेब पाटोळे | 11 |
| 4 | महामारी और कोवीड-१९ का इतिहास | प्रा. डॉ. शे. रज़िया शहेनाज़ शे. अब्दुला | 16 |
| 5 | कोविड-१९ चा भारतातील स्त्रियांवरील परिणाम : एक आकलन | डॉ. शारदा सा. कदम | 20 |
| 6 | कोविड-१९ आणि स्त्रियांचे आहार, आरोग्य, मानसिकता : एक आकलन | डॉ. बबन पवार | 23 |
| 7 | भारतातील कोविड-१९ चा विविध क्षेत्रावरील परिणाम : एक आढावा | प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे | 26 |
| 8 | कोविड १९ का ग्रामीण जीवन पर प्रभाव | प्रा.डॉ.दळवे सुर्यकांत माधवराव | 29 |
| 9 | हवामान परिवर्तन आणि भारत | प्रा.डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयाँ | 31 |
| 10 | कोव्हीड-१९ चा भारतीय ग्रामीण जीवनावरील परिणाम | प्रा.डॉ. सुदाम वसंतराव पवार | 37 |
| 11 | कोव्हीड-१९ चा भारतीय शहरी जीवनावरील परिणाम | प्रा. बालाजी शिंदे | 41 |
| 12 | कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील दिसून येणारे प्रासंगिक मूल्य | प्रा.डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी | 44 |
| 13 | कोरोना : लक्षणे, काळजी व उपाय | डॉ. भिम गणपतराव माने | 50 |
| 14 | कोविड–१९ व भारतीय समाज | प्रा. डॉ.घोलप कमलाकर गोरख | 54 |
| 15 | पर्यावरणात्मक घटकांवर कोविड – १९ चा परिणाम | डॉ. शेख रशिदा बेगम रहेमतुल्ला | 60 |
| 16 | कोरोना महामारी ( कोविड १९ ) चे सामाजिक,आर्थिक व राजकीय परिणाम. | प्रा.मिलिंद व्यंकटी घाडगे | 65 |
| 17 | प्लेग एक जगातील भयंकर आजार | प्रा. घाडगे रघुनाथ व्यंकटी | 69 |
| 18 | कोवीड–१९ का भारत के ग्रामीण जिवनपर परीणाम | प्रा. डॉ. राजेश एस. डोंगरे / प्रा. विनोद एम. बडवाईक | 71 |




Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
September, 2020


| | | |
|---|---|---|
| 51 | Covid 19 चा भारताच्या ग्रामीण व शहरी जीवनावर होणारा परिणाम : एक अभ्यास डॉ. चंद्रशेखर पाटील | 191 |
| 52 | महामारी : इतिहास तथा सामाजिक व आर्थिक परिणाम प्रा. नयन भादुले -राजमाने | 194 |
| 53 | कोरोना महामारीचा पर्यटन क्षेत्रावर झालेला परिणाम श्रीमती शिंदे मीनाक्षी प्रल्हादराव | 197 |
| 54 | स्थलांतर : करोना काळातील लक्षवेधी प्रा. रमेश अंबऋशी शितोळे | 201 |
| 55 | कोरोना संसर्गाचा पर्यटन क्षेत्रावर होणारा परिणाम प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु. | 203 |
| 56 | कोरोनाची परिस्थिती आणि मराठी कवितेतील प्रतिमा प्रा. डॉ. गोविंद काळे | 209 |
| 57 | कोविड १९- चे आरोग्य, शैक्षणिक, रोजगार आणि सांस्कृतिक क्षेत्रावरील परिणाम : एक अभ्यास प्रा. डॉ. ज्ञानदेव शिवनाथ नागवे | 213 |
| 58 | कोरोना विषाणु — शोध, आजार व उपाययोजना प्रा.डॉ. कदम सतिश रावसाहेब | 216 |
| 59 | कोरोनाचे भय आणि बिघडलेली सामाजिक स्थिती प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रसेन उकिरडे | 219 |
| 60 | कोव्हीड-१९ च्या महामारीचा भारतीय समाज जीवनावर झालेला परिणाम प्रा. गायकवाड डी.डी. | 224 |
| 61 | कोरोना महामारी आणि भारतीय ऑनलाईन शिक्षण पद्धतीतील बदल प्रा.अर्जुन बंडू गजमल | 227 |
| 62 | दुसऱ्या जागतिक शीतयुद्धाच्या वाटचालीत कोव्हीड-१९भूमिका— एक चिकित्सक अभ्यास प्रा.अरूण वसंत अवसरमल | 230 |
| 63 | कोविड- १९ चा मानवी समाजजीवनावर झालेला परिणाम प्रा.कांबळे रोशनी बाबुराव | 238 |
| 64 | महामारी व कोविड १९- चा इतिहास एक दृष्टिक्षेप प्रा. डॉ. महादेव गणपत देशमुख | 242 |
| 65 | कोवीड—१९ चा भारतातील ग्रामिण व शहरी जीवनावरील परिणाम सौ. शितल संभाजी सावंत | 247 |




Scanned with CamScanner

# स्थलांतर : करोना काळातील लक्षवेधी

रमेश अंबऋशी शितोळे
सहा.प्राध्यापक,इतिहास विभाग प्रमुख
श्री. वसंतराव फराटे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मांडवगण फरटा
ता. शिरूर,जिल्हा पुणे.

'स्थलांतर' हा मानवी जीवनातील आजवरच्या इतिहासात कायमच महत्त्वाचा घटक राहिला आहे. आदीम काळापासून आजच्या कोरोना संकटापर्यंत माणसे सतत एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी जात राहिली आहेत. कधी संकटापासून दूर जाण्यासाठी तर कधी पोटाची खळगी भरण्यासाठी. या स्थलांतर करणाऱ्या माणसांशी तेथील मूळच्या लोकांसोबत झालेल्या संघर्षाच्या आणि सहकार्याच्या कहाण्यांनी माणसाचा इतिहास भरलेला आहे. आज एकविसाव्या शतकात, वाढलेला प्रवासाचा वेग आणि संपर्काची क्रांती यामुळे या स्थलांतराचे नवेनवे पैलू सामोरे येत आहेत. भारतात अशा प्रकारचे अनेक साथीचे रोग यापूर्वीही आलेले आपणास दिसून येतात. १८९७ मध्ये उद्भवलेल्या महाभयंकर जीवघेण्या प्लेगच्या साथीचा अनुभव आपणास आहे. दुष्काळ हा सुद्धा भारतीयांच्या जीवनातील परिवर्तनवादी घटक आहे. असे अनेक अनुभव आपल्या पाठीशी असताना देखील आपण याकडे गांभीर्याने घेत नाही. १९४७ च्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक देश म्हणून आपली ओळख तयार झाल्यावर, स्थलांतराविषयीच्या आपल्या धारणा या गुंतागुंतीच्या झालेल्या आढळतात.

भारतीय राज्यघटनेने दिलेला देशांतर्गत कोठेही प्रवास-स्थलांतराचा अधिकार, तसेच देशातील अन्य राज्यात जाऊन स्थायिक होण्याचा हक्क यामुळे देशांतर्गत स्थलांतराच्या प्रक्रियेला न्यायमान्यता मिळाली. या घटनेतील तरतुदीमुळे देशातील तळागाळातील नागरिकांना खूप फायदा झाला. काहींनी जिथे पोट भरेल तिथे जाण्यासाठी स्थलांतर केले, तर कुणी आता राहत असलेल्या गावातील परिस्थितीला कंटाळून नव्या ठिकाणची वाट धरली. पण आपल्याकडे नोकरी-उपजीविका हा उद्देश सोडल्यास, सामाजिक आणि राजकीय स्तरावरील स्थलांतराचा तितकासा गांभीर्याने विचार झाला नाही. या पलिकडेही कोणत्याही स्थलांतराच्या अनेक बाजू असतात. राष्ट्र, भाषा, जात/जमात, श्रद्धा, अस्मिता, त्यांचे राजकारण आणि बाजारपेठेवर-अर्थकारणावर प्रभाव टाकणाऱ्या वेगवेगळ्या सामाजिक गुंतागुंती इत्यादी मुद्द्यांवर मूळचे आणि बाहेरचे यांच्यात होणारा संघर्ष आणि नंतरचे जुळवून घेणे या प्रक्रिया वर्षानुवर्षे चालणाऱ्या प्रक्रिया आहेत. अनेकदा समाजातील या स्थलांतराच्या, समाजात मिसळून जाण्याच्या किंवा जुळवून घेण्याच्या प्रक्रिया अनेकदा दुर्लक्षित केल्या जातात. मानववंशशास्त्रामध्ये स्थलांतराचा अभ्यास कित्येक वर्षे केला जात आहे. डग्लस मेस्सी या विख्यात समाजशास्त्रज्ञाने सांगितल्यानुसार, "समाजशास्त्राचा अभ्यास करताना केवळ एकसारख्या किंवा एकाच प्रकारच्या उदाहरणांना ठेवून स्थलांतराचा अभ्यास होत नाही. त्यासाठी वेगवेगळ्या ज्ञानशाखांतून, वेगवेगळ्या प्रदेशांतील घडामोडींमधून विचारसरणींमधून समोर आलेले मुद्दे व दृष्टिकोन यांचा सैद्धांतिक परामर्श स्थलांतराच्या इतिहास-समाजशास्त्राचा विचार करताना घ्यावा लागतो. त्यामुळे अनेकदा असा अभ्यास काहीसा संकुचित, अपुरा, संज्ञा आणि संकल्पनांच्या गुंतागुंती आणि गैरसमजांनी भारलेला वाटतो."



Scanned with CamScanner

भारतीय इतिहासाच्या मांडणीविषयीच्या उजव्या-डाव्या इत्यादी सर्व विचारसरणींमध्ये संस्कृतीचा विकास, अस्त आणि अस्तित्व या गोष्टींना नेहमीच अतिशय महत्त्व दिले जाते. सिंधू संस्कृती, वैदिक संस्कृती, हल्ली राजकीय वर्तुळात आणि त्यामुळे अकादमिक क्षेत्रातही सातत्याने चर्चेत येणारी सरस्वती नदीच्या खोऱ्यातील संस्कृती किंवा धर्मनिहाय हिंदू-बौद्ध-जैन संस्कृती आणि लोकाचार यांच्या अस्तासाठी परकीय, परधर्मीय आक्रमणे आणि पूर-भूकंपादि घटना कारणीभूत असल्याचे सरधोपटपणे आपल्याकडे सांगितले जाते. एखाद्या संस्कृतीचा किंवा आचारपद्धतीचा अस्त म्हणजे कुठल्याही विवक्षित मानवी वंशाचा किंवा आचार पद्धतीचा ठरवून केलेला/झालेला विनाश नसतो. नैसर्गिक आपत्ती, रोगराईमुळे हस्तिनापुरासारखी मोठी शहरे आपले महत्त्व गमावून बसल्याची अनेक उदाहरणे प्राचीन साहित्यात दिसून येतात. प्रतिष्ठान (पैठण), उस्मानाबादजवळील तेर (तगर) सारखी व्यापार उदिमामुळे राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या भरभराटीला आलेली शहरे कालौघात आपले वैभव गमावून बसल्याचे आपण जाणतो. सिंधू नदीच्या खोऱ्यातून किंवा गंगेच्या खोऱ्यातून वेगवेगळ्या कारणांमुळे कोकणात, पूर्वभारतात, दक्षिण भारतात वेगवेगळ्या काळात स्थलांतरे झाल्याची शेकडो उदाहरणे पुराने आणि बौद्ध ग्रंथांतून, वेगवेगळ्या स्मृतीग्रंथांतून आपल्याला वाचायला मिळतात.

एखादे शहर किंवा प्रदेशाने आपले राजकीय-सांस्कृतिक किंवा नागरी वैभव गमावण्याची प्रक्रिया नैसर्गिक आपत्तींमुळे घडू शकते यात शंका नाहीच. मात्र या एका कारणाशिवाय अर्थशास्त्रीय किंवा व्यवस्थापकीय नियोजन करणाऱ्या यंत्रणांचा अभाव आणि पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यातील अपयश हे या संस्कृतींच्या किंवा शहराच्या इतिहासजमा होण्याचे मुख्य कारण असल्याचे दिसून येते. एखाद्या नैसर्गिक संकट किंवा आपत्तीमुळे शहराची किंवा संस्कृतीची मूळ वृत्ती-प्रकृती बदलून त्या शहराचा-संस्कृतीचा, प्रदेशाचा कायापालट होण्याची प्रक्रिया वाढीस लागण्याची अनेक उदाहरणे पानशेत धरणासारख्या पुणे शहराला अंतर्बाह्य बदलून टाकणाऱ्या संकटांनी आपल्यासमोर उभी आहेत.

कोरोनासारख्या अनेक विषाणूंना किंवा अनेक नैसर्गिक आपत्तींना आपल्याला भविष्यात तोंड देण्याची तयारी आता करावीच लागणार असल्याचे भाकीत, त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ-अभ्यासक मंडळी करत आहेत. समाजशास्त्रीयदृष्ट्या आपल्या संस्कृतीला, देशाच्या आकृतिबंधाला संतुलित स्वरूपात जपून ठेवत विकास साधायचा असेल तर आपल्याला स्थलांतरे, विकासप्रक्रिया आणि व्यवस्थापन यांचे संतुलन साधणाऱ्या नवनव्या पद्धतींचा विचार करावाच लागेल. अन्यथा आपल्या ज्या संस्कृतीला आपण आपल्या अस्मितेच्या मानदंडाच्या अग्रस्थानी ठेवलेले असते त्या संस्कृतीचा चेहरामोहरा बदलून जाऊन, तिला जडत्व प्राप्त होण्याचा धोका फार दूर नाही.

संदर्भ :

१.प्रा. व्ही.बी.पाटील, संपूर्ण समाजशास्त्र, के.सागर. पब्लिकेशन
२. राम अहुजा, सामाजिक समस्याए, तृतीय संस्करण
3. प्रा. रा.ना. घाटोळे. भारतीय समाज व्यवस्था, श्री.मंगेश प्रकाशन नागपूर.
४. बिपीन चंद्र , डॉ. एस. व्ही. काळे, आधुनिक भारत, के.सागर. पब्लिकेशन



Scanned with CamScanner